<u>सं. फौ. ख. क्र.३३७/२०२१</u> निशाणी १४

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

नाव – अशोकसिंग गुलाबसिंग ठाकुर

वय – ५५ वर्षे, व्यवसाय – पोलीस हवालदार, ब.क्र.१०१५, दहशतवाद विरोधी शाखा

पत्ता – रा. पोलीस वसाहत, अकोला, ता. जि. अकोला

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. के. एस. ताकवाले यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. दि.०२.०३.२०२१ रोजी मी पोलीस अधिक्षक, अकोला यांच्या विशेष पथकामध्ये पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. आमच्या वरीष्ठांनी उरळ परिसरातील अवैध धंद्यावर कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते. त्यामुळे मी, पोलीस हवालदार निखाडे, पोलीस हवालदार महेंद्र मलिये, इतर स्टाफ व दोन पंच असे मिळून कारवाई करण्याकामी आमच्या खाजगी वाहनाने उरळ हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना ग्राम निमकर्दा येथे दुपारी १३.०० वा. गुप्त बातमीदाराने माहिती दिली की, उरळ येथील पोहरे यांच्या प्लॉटच्या पाठीमागे असलेल्या शेतात बाभडीच्या झाडाखाली काही इसम वरली मटक्याच्या आकड्यावर पैशाची हारजीत करुन खेळत आहेत. सदरची मिळालेली माहिती वरीष्ठांना देवून त्यांच्या तोंडी आदेशान्वये सदर माहिती दोन पंचांना देवून ग्राम निमकर्दा येथून उरळ या ठिकाणी गेलो.

२. आम्ही आमच्या जवळ नेलेले वाहन एका बाजूला लावले व मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोहरे यांच्या प्लॉटमागील शेतात गेलो असता बाभडीच्या झाडाखाली लोकांची गर्दी दिसून आली. आम्ही त्यांची लपून पाहणी केली असता एक इसम हजर असलेल्या लोकांना वरलीचे आकडे लिहीलेल्या चिठ्या देवून पैसे घेताना दिसून आला त्यावरुन आमची व पंचांची खात्री झाल्याने त्या ठिकाणी आम्ही छापा टाकला असता तेथे ७ इसम मिळून आले. त्यांच्या जवळून वरली चिठ्या पट्टी बुक, एक कार्बन तुकडा, डॉट पेन व ६ वरलीचे आकडे लिहीलेल्या चिठ्या मिळून आल्या तसेच नगदी रु.१०,२८०/– मिळून आले.

३. सदर मिळून आलेला मुद्देमाल हा दोन पंचांसमक्ष जप्त करुन ताब्यात घेतला तसेच घटनास्थळाचा पंचनामा देखील दोन पंचांसमक्ष केला. आता मला सदर घटनास्थळ

व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी, दोन पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येत आहे. त्यानंतर सदर मिळून आलेले ७ इसम व मुद्देमाल घेवून पो.स्टे. येथे गेलो. सदर घटनेची मी फिर्याद दाखल केली व त्यावरुन गुन्हा नोंद करण्यात आला. आता मला सदरची फिर्याद दाखविण्यात आली ती तीच असून त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येत आहे. आता मला छापील फिर्याद दाखविण्यात आली ती तीच असून त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येत आहे. सदर छाप्या दरम्यान मिळून आलेल्या इसमांना मी पाहिल्यास ओळखू शकतो. सदर ७ इसमांपैकी ३ इसम आज न्यायालयात हजर असल्याबाबत साक्षीदार यांनी सांगितले.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती व्ही. एच. शेगोकार यांच्या मार्फत उलटतपासः</u>**

४. हे म्हणणे खरे नाही की, मी जप्ती व घटनास्थळ पंचनामा हा पो.स्टे. मध्येच तयार केलेला आहे. आमच्या वरीष्ठांनी उरळ परिसरातील अवैध धंद्यावर कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते, त्याबाबत लेखी त्यांनी दिलेले नव्हते, सदर कारवाई बाबत आम्हाला तोंडी आदेश होते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या सोबत असलेले पंच यांना मी पो.स्टे. येथे बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, खोटा पुरावा देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वरीष्ठांनी आम्हाला कोणतेही आदेश दिले नसल्याने मी कोणतीही कारवाई केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे बयाण तपासिक अधिकारी यांनी घेतलेले नाही.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ३०.०८.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.08.30 16:06:50 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ३०/०८/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ३०/०८/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ३०/०८/२०२५ |